# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

**३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१**

दूरध्वनी (०२२) २२६४११५१/२२६१७९६९ फॅक्स२२६९०००७

**E-mail : mcm.dte@gmail.com** **Website:http://www.dte.org.in**


जा.क्र.अल्पसंख्याक/ शिष्यवत्ती/२०१०/०३२
दिनांक-८.२.२०१०

# अधिसूचना

## अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक आणि व्यावसायिक/१२ वी नंतरचे सर्व (कला, वाणिज्य आणि विज्ञान) अभ्यासक्रमास प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनाची शिष्यवृत्ती

महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास मंत्रालयाने **मुस्लीम, शिख, बौध्द, ख्रिश्चन, पारशी व जैन** या अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक आणि व्यावसायिक ,१२ वी नंतरच्या सर्व (कला, वाणिज्य आणि विज्ञान) अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल व गुणवत्ताधारक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना लागू केलेली आहे. सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २००९-२०१० मध्ये प्रथम ते अंतिम वर्षामध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचे **नविन शिष्यवृत्ती** व **नूतनीकरणासाठी** ऑन लाईन/ऑफलाईन ॲप्लीकेशन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

❖ **शिष्यवृत्तीसाठी पात्र अभ्यासक्रम** :

**(अ)** अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र **पदविका**, पदवी व पदव्युत्तर पदवी (बी.ई/बी.टेक./एम.ई/एम.टेक. इ.सर्व अभ्यासक्रम), सिंमेट टेक्नॉलॉजी, फॅशन टेक्नॉलॉजी, औषधनिर्माणशास्त्र (बी.फार्म/एम.फार्म), वास्तुशास्त्र (पदवी व पदव्युत्तरपदवी),हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, उपयोजित कला व शिल्प, एम.सी.ए./ एम.बी.ए./एम.एम.एस., पशु संवर्धन व पशु वैद्यकीय, विधी (एल.एल.बी. एल.एल.एम.) चार्टड अकौटंट. इत्यादी .

**(ब)** १२ वी नंतरचे सर्व (कला, वाणिज्य आणि विज्ञान) अभ्यासक्रम.

❖ **किमान पात्रता व अटी :-**

१) अर्जदार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा व माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.
२) सामाईक परीक्षेद्वारे (सीईटी) अथवा परीक्षा न देता अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला विद्यार्थी.
३) अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.
४) अर्जदाराच्या पालकाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त नसावे
५) नूतनीकरणासाठी विद्यार्थ्यांने पुढील वर्षात प्रवेश घेतलेला असावा.
६) या योजनेत ३० टक्के जागा मुलींसाठी राखीव.

❖ **<u>आवश्यक कागदपत्रे खालील प्रमाणे जोडावीत.</u>**

१) अर्जावर विद्यार्थ्यांची स्वतः ची स्वाक्षरी असलेली पासपोर्ट आकाराचे छायाचित्र.

२) विद्यार्थ्याने माध्यमिक (१० वी) नंतरच्या परिक्षांच्या गुणांची गुणपत्रिकांची साक्षांकित प्रती.

३) स्वतः चा व्यवसाय असलेल्या पालकांच्या बाबतीत उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतांद्वारे मिळणा-या वार्षिक उत्पन्नविषयीचे अन्यायीक स्टॅम्प
पेपर रु.१०/-वरील घोषणापत्र/ नोकरीस असलेल्या पालकांच्या बाबतीत प्राप्त केलेला उत्पन्नाचा दाखला किंवा
आयकर विवरणपत्राची सत्यप्रत.

४) कायम निवसाच्या पत्त्यासंबंधी पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत, वीज/दूरध्वनी प्रत, पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची
प्रत इ. (कोणतीही एक)

* **<u>नुतनीकरणासाठी फक्त मागील वर्षाची गुणपत्रिका आणि वार्षिक उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत (मागील वर्षाचा अर्ज</u>**
**<u>क्रमांक लिहिलेला) जोडण्यात यावा</u>**.

❖ **<u>अर्ज करण्याची पध्दत</u>** :- (तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रम).

- चालू शैक्षणिक वर्षापासून शिष्यवृत्तीचे ऑन लाईन ॲप्लीकेशन सिस्टीम पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.
- पात्र व इच्छुक विद्यार्थ्यानी **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज करावा.
- अर्ज भरतेवेळी संगणक आपल्यासाठी एक ॲप्लीकेशन आय.डी. तयार करेल. विद्यार्थ्याने ॲप्लीकेशन आय. डी. व
पासवर्ड याची नोंद करुन ठेवावी जेणेकरुन पुढील कार्यवाहीसाठी त्याचा उपयोग करता येईल.
- अर्ज भरुन पूर्ण होताच विद्यार्थ्याने त्याची प्रिंटआऊट घ्यावी व त्याला आवश्यक कागदपत्रे जोडून आपल्या संस्थेमध्ये
पुढील कार्यवाहीसाठी सादर करावे.

❖ **<u>अर्जाची छाननी व अर्ज पाठविण्याची पध्दत</u>** :-

१ **तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या संस्था-**

संबधित संस्थेने तंत्रशिक्षण संचालनालयाने दिलेल्या कोडनुसार लॉगऑन करावे व विद्यार्थ्याने भरलेली माहिती त्याने दिलेल्या कागदपत्राच्या आधारे तपासून पहावी. अर्ज संगणकावर दिलेल्या सुविधेद्वारे निश्चित करावा व विद्यार्थ्याला याबाबतची पावती देण्यात यावी. विद्यार्थ्याच्या अर्जाची तपासणी तपशिलवार माहिती तयार करुन संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठवून दयावी.

२ **तंत्र संचालनालयाच्या व्यतिरिक्त असलेल्या महाराष्ट्रातील संस्था-**

विद्यार्थ्याच्या अर्जाची तपासणी करुन प्रमाणित संबंधित विभागीय कार्यालयाकडे पाठवून दयावी.

३ **शासनमान्य असलेल्या परंतु महाराष्ट्राबाहेरील संस्था-**

संस्थांनी अर्जाची तपासणी करुन अर्ज थेट तंत्र शिक्षण संचालनालय येथे पाठविण्यात यावे.

➢ **कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम**

पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रत **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर डाऊनलोड करुन आवश्यक कागदपत्रांसोबत आपल्या संस्थेत अर्ज सादर करावा.

- ❖ विभागिय कार्यालयांची यादी **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर देण्यात आली आहे.
- ❖ या योजनेबद्यल अधिक माहिती आणि त्याच बरोबर अर्ज भरण्याची **पध्दत, आवश्यक कागदपत्रे** याबाबतची संपूर्ण माहिती **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.

❖ **वेळापत्रक**-

| अ.क्र. | कार्यसूची | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑन लाईन ॲप्लीकेशन सिस्टीम पद्धतीने विद्यार्थ्यानी अर्ज करणे. | **१/३/२०१०** |
| २ | अर्ज तपासणी करुन संस्थेने संगणकावर अर्ज निश्चित करणे. | **२/३/२०१०** |
| ३ | तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय आणि तंत्र संचालनालय यांच्याकडे अर्जाची लिखित प्रत पाठविण्याचा अंतिम दिनांक. | **८/०३/२०१०** |
| ४ | संकेतस्थळावर तात्पूरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक. | **१५/०३/२०१०<br>दुपारी ३.०० वाजता** |
| ५ | काही तक्रार असल्यास फॅक्सद्वारे विद्यार्थ्यानी संचालनालयास सादर करावयाचा दिनांक ( फॅक्स नं.०२२-२६९०००७) | **१७/०३/२०१०<br>५.०० वाजेपर्यंत** |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी/निवड यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. | **२०/३/२०१०<br>दुपारी ५.०० वाजता** |

ज्या विद्यार्थ्याना शिष्यवृत्ती मंजूर होईल अशा विद्यार्थ्याची शिष्यवृत्तीची रक्कम इ-ट्रान्सफरद्वारे त्यांच्या **बँक ऑफ महाराष्ट्र / स्टेट बँक ऑफ इंडिया** / कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल. **संस्थेमार्फत सादर करण्यात आलेल्या अर्जाचा शिष्यवृत्तीसाठी विचार करण्यात येईल.** अधिक माहिती **www.dte.org.in** आणि **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर पाहण्यात यावी अथवा हेल्पलाईन दूरध्वनी क्र. ०२२-२२६१७९६९ येथे संपर्क साधावा.

**टिप**- ज्या विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या गुणवत्ता नि-साधन शिष्यवृत्ती २००९-२०१० करीता अर्ज केलेला आहे. आणि त्यांच्या अर्जाची छाननी होऊन ज्यांचे नाव **www.dte.org.in/mcm** या संकेतस्थळांवर दर्शविण्यात आलेले आहे त्यांनी या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची आवश्याकता नाही. त्या विद्यार्थ्यांचा अर्ज राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीसाठी ग्राहय धरला जाईल.

(**डॉ. सु. का. महाजन**)
नोडल ऑफिसर तथा प्र. संचालक
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई